

फराळमध्ये गीताबाली

अवघ्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत ७० चित्रपटांत काम करणाऱ्या गीताबालीने वयाच्या पस्तिसाव्या वर्षी या जगाचा निरोप घेतला. गीताबाली म्हणजे मूर्तिमंत उत्साह आणि सळसळतं चैतन्य. बावरे नैन, बाजी, जाल, सुहाग रात, अलबेला यांसारख्या चित्रपटात तिने साकारलेल्या भूमिका आपण आजही विसरू शकत नाही. दुर्दैवाने ही प्रतिभावंत अभिनेत्री 'बी' ग्रेड चित्रपटातच अधिक गुंतून राहिली. आपल्यापेक्षा वर्षभराने लहान असलेल्या शम्मी कपूरबरोबर बाणगंगेच्या एका देवळात गुपचूप विवाह करणाऱ्या गीताबालीला दोन मुलं झाली. त्यानंतरही ती अभिनयात सक्रिय होती. राजिंदर सिंघ बेदीच्या 'एक चद्दर मैली सी'वरून एका कलात्मक चित्रपटाची निर्मिती तिने हाती घेतली होती. त्यात मुख्य भूमिका स्वतः साकारली तर धर्मेंद्र तिचा नायक होता. चित्रीकरणादरम्यानच तिला देवी आल्या आणि १०७ डिग्रीपर्यंत पोहोचलेल्या ज्वराने त्या आजारातच तिचा बळी घेतला...